क्र.शिछपु/जीगौपु/२००५-०६/का-९,
क्रीडा व युवकसेवा संचालनालय,
महाराष्ट्र राज्य,पुणे
दिनांक 6 NOV 2006

प्रति,

अध्यक्ष/सचिव,
एकविध खेळांच्या राज्य संघटना,
महाराष्ट्र राज्य.

**विषय** :- शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवन गौरव पुरस्कार-२००५-०६

**संदर्भ.** :-१), सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग,शासन निर्णय क्र.शिछपु/२००४/प्रक्र-१५३/क्रीयुसे-२, दिनांक २ जुलै, २००४

२) शासन निर्णय क्र.शिछपु-२००२/प्र.क्र.७३/क्रीयुसे-२, दिनांक १९ ऑक्टोबर, २००६.

ज्येष्ठ क्रीडापटू, क्रीडा मार्गदर्शक, क्रीडा संघटक,कार्यकर्ते व क्रीडा क्षेत्राशी संबंधित अशा ज्या व्यक्तींनी क्रीडा व खेळासाठी आपले सर्वस्व पणाला लावून आपले जीवन क्रीडा विकासासाठी व्यतित केले आहे, अशा ज्येष्ठ क्रीडा महर्षिचा गौरव करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनामार्फत **'शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवन गौरव पुरस्कार'** प्रदान करण्यात येतो.

महाराष्ट्रात वास्तव्य करणारे वय वर्षे ६० किंवा त्यापेक्षा अधिक वयाचे क्रीडापटू, क्रीडा मार्गदर्शक, कार्यकर्ते/संघटक व क्रीडा क्षेत्रात काम करणा-या इतर व्यक्ति, ज्यांनी आपल्या अतुलनीय कामगिरीने महाराष्ट्राच्या क्रीडा संस्कृतीची जोपासना केली आहे, त्यामध्ये लक्षणीय भर टाकली आहे आणि क्रीडा क्षेत्रात महाराष्ट्राचे नाव देशात व आंतरराष्ट्रीय पातळीवर उंचविण्याची संस्मरणीय कामगिरी केली आहे किंवा क्रीडा क्षेत्रात मूलभूत स्वरुपाचे विशेष कार्य केले आहे, अशा स्वरुपाच्या व्यक्ती या पुरस्कारासाठी पात्र राहतील. मात्र त्याकरिता संबंधितांकडून अर्ज न घेता आपल्या संघटनेने संबंधित व्यक्तीच्या कार्याचा तपशिल घेऊन संघटनेस शिफारस करता येईल.

विविध खेळाच्या विकासासाठी अहर्निश कार्यरत असणा-या आपल्या संघटनेच्या अथवा आपणास ज्ञात असलेल्या व्यक्तींची माहिती खालील प्रपत्रामध्ये दिनांक १५ डिसेंबर पर्यत गोपनीय स्वरुपात संचालनालयास पाठवावी, अशी आपणास विनंती आहे.

(स्थळप्रत मा.संचालकांनी अनुमोदीत)

(ना.ऊं.श्रोते)
सहसंचालक,
क्रीडा व युवकसेवा,महाराष्ट्र राज्य,पुणे

## प्रपत्र

## शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवन गौरव पुरस्कार-२००५-०६

१) शिफारस करणा-या संघटनेचे नाव :

व पत्ता :

२) पुरस्कारासाठी शिफारस केलेल्या व्यक्तीचे :

संपूर्ण नाव व पत्रव्यवहाराचा पत्ता :

(दूरध्वनी क्रमांकासह)

३) जन्मतारीख :

४) शिक्षण :

५) व्यवसाय :

६) क्रीडा क्षेत्रातील कामगिरीचा वर्षनिहाय :

तपशिल

| वर्ष | तपशिल |
|---|---|
| | |

स्वाक्षरी